घड्याळ म्हंटल की..
विठ्ठल वॉच
नामवंत कंपन्यांची घड्याळे
मिळतील विक्री व दुरूस्ती
सुधाकर कॉम्पलेक्स,नगरपलिकेसमोर
मायणी रोड,विटा (जि.सांगली)
८२६२८३५३९१-९४२१२२१६३०

# प्रीतिसंगम

www.pritisangam.com
सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर

महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
स्थापना- 1986
पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिट्यूट सातारा
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - 10 वी, 12 वी पास/ नापास व कॉलेजचे विद्यार्थी
✲ इलेक्ट्रिकल सुपरवायझर ✲ ऑटोमोबाईल टेक्निशियन
✲ इलेक्ट्रिकल वायरमन ✲ मोटार वायडिंग
✲ टू-व्हीलर मेकॅनिक ✲ फोर व्हीलर मेकॅनिक
✲ A.C. मेकॅनिक ✲ वेल्डर / प्लंबर
✲ कॉम्प्युटर ऑपरेटर ✲ कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, लायसन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : 9822097071 / 7709509500

| वर्ष ३० वे | अंक ९१ | पाने ४ | किंमत २ रूपये | शुक्रवार ३१ जुलै २०२६ | R.N.I.No.MAHMAR./2001/10338 | पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 | फोन-२२७७२५

# लाठीचार्जसाठी शाहांनी राजीनामा द्यावा

## मल्लिकार्जुन खरगे:राज्यसभेतही पेपर लीक सुधारणा विधेयक मंजूर

**नवी दिल्ली/प्रतिनिधी:–**

केंद्र सरकारकडून राज्य मंत्री जितेंद्र सिंह यांनी राज्यसभेत सार्वजनिक परीक्षा अयोग्य मार्गांचा प्रतिबंध सुधारणा विधेयक २०२६ मांडले. यानंतर राज्यसभेतही सत्ताधारी विरोधक यांच्यात गदारोळ झाला. तर नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर हल्लाबोल करत विद्यार्थ्यांवरील लाठीचार्ज, पॅलेट गनच्या वापराचे आदेश कोणी दिले असा सवाल करत देशाला या प्रश्नांची उत्तरे हवी आहेत, गृहमंत्री त्याची उत्तर देऊ शकत नसतील तर अमित शाह यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी या विधेयकावर बोलताना काँग्रेसचे अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी केली.

पेपर चोरणारे वाचले, मेहनत करणारे मार खात राहिले, हा कसला न्याय, ही कसली पद्धत असा सवाल मल्लिकार्जुन खरगे यांनी केला.पेपरलीक झाल्यानं कित्येक निर्दोष लोकांचं नुकसान झालं, कित्येक लोकांना मारहाण झाली, कित्येक आई वडील त्रस्त आहेत, कित्येक महिला, मुलं त्रस्त आहेत हे समोर आणायचंय, असं खरगे म्हणाले.

सरकारने जे विधेयक आणलंय त्यात आकडेवारी बदलली आहेत, त्यातून काही होणार नाही. जादा दंड, कठोर शिक्षा, स्पेशल टास्क फोर्स, फास्ट ट्रॅक कोर्ट यासारख्या गोष्टींचा उल्लेख त्यात आहे, त्यामुळे काही फरक पडणार नाही, असं



मल्लिकार्जुन खरगे म्हणाले. पेपरफुटी कशी रोखणार हे सरकारने सांगायला पाहिजे होतं, असं खरगे यांनी म्हटले होते. २०२४ मध्येच मजबूत कायदा आणावा अशी मागणी केली होती, तेव्हा तुम्ही आमचं ऐकलं नाही. आता ज्या गोष्टी करताय त्या २०२४ मध्ये का केल्या नाहीत, कारण तेव्हा तुम्हाला राजकारण करायचे होते, असा हल्लाबोल मल्लिकार्जुन खरगे यांनी केला. सरकारनं आकडे बदलले मात्र पेपरफुटी कशी रोखणार याचा उद्देश सांगितला नाही. रस्त्यावर उतरलेल्या विद्यार्थ्यांना शांत करण्यासाठी बिल आणले गेले, असे खरगे यांनी म्हटले.

### खुर्ची वाचवण्यासाठी प्रधानांचा राजीनामा

देशातील विद्यार्थ्यांनी विद्यार्थी आणि तरुणांनी परीक्षा व्यवस्थेतील त्रुटींविरोधात आवाज उठवला. विरोधी पक्षांनी विद्यार्थ्यांचा आवाज रस्त्यापासून संसदेपर्यंत उचलला. दबाव वाढल्यानं विद्यार्थ्यांच्या संघर्षापुढं झुकावं लागलं. पंतप्रधानांना प्रधानांना हटवावं लागलं, ही युवकांची ताकद आहे. तरुणांची ताकद पाहून सरकारला वाटलं की आणखी ताणल्यास धागा तुटेल आणि आपली खुर्ची जाईल, त्यामुळं अखेरीस त्यांनी विद्यार्थ्यांची मागणी मान्य केली. स्वत: खुर्ची वाचवण्यासाठी त्यांनी प्रधानांचा राजीनामा घेतला, असा हल्लाबोल मल्लिकार्जुन खरगे यांनी केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह बोलत नाहीत. दिल्लीत इतकी गडबड होऊन देखील गृहमंत्री काही बोलत नाहीत, तोंड शिवलं का कोणी, देशाच्या भल्यासाठी बोलावं लागतं. अपमान सहन करावा लागतो. अशा शब्दात मल्लिकार्जुन खरगे यांनी अमित शाह यांच्यावर हल्लाबोल केला. २० जुलै रोजी हजारो विद्यार्थी संसदेवर मार्च काढणार होते, त्यांना संवाद हवा होता. लाठीचार्ज, अश्रूधूर, वॉटर कॅनन, पॅलेट गन, करंटच्या बॅरिकेडस, खिळे असणाऱ्या काठ्या, मेट्रो बंद, इंटरनेट बंद हे त्यांना मिळालं. हे सर्व तुम्ही केलं, त्यामुळं विद्यार्थी संतापले, नागरिक संतापले. तुम्ही विद्यार्थ्यांसोबत शांततेत बोलू शकला नाही. १०० हून अधिक विद्यार्थी आंदोलक जखमी झाले, असं मल्लिकार्जुन खरगे म्हणाले. गावागावातून आलेल्या विद्यार्थ्यांवर पॅलेट गन चालवल्या गेल्या, ते विद्यार्थी दवाखान्यात आहेत, कोणाचा डोळा गेला, कान गेला, हात तुटला, पाय तुटला याचे जबाबदार गृहमंत्री आहेत, असा हल्लाबोल खरगे यांनी अमित शाह यांच्यावर केला. बंद खोलीत तुम्ही खूप दिवस राहू शकत नाही, तुम्हाला आम्ही खेचून बाहेर काढू, असा इशारा खरगे यांनी दिला. मल्लिकार्जुन खरगे यांनी दिल्लीतील आंदोलकांवरील लाठीचार्ज आणि पॅलेट गनच्या वापराच्या मुद्यावरुन अमित शाह यांच्या राजीनाम्याची मागणी केली.



# कोयना धरणातून पाणी सोडले

**पाटण/प्रतिनिधी:–**

अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष लागलेल्या छत्रपती शिवाजी महाराज जलसागर कोयना धरणाचे वरील सहा वक्र दरवाजे एक फूटाने उघडून नदीपात्रात पाणी सोडण्यात आले. पायथा वीज गृहातून १०५० आणि वरील वक्र दरवाजातून ५०७९ एकूण ६१२९ क्युसेक्स पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. पावसाचे प्रमाण आणि धरणात येणाऱ्या पाण्याची आवक वाढली तर धरणातील पाणी पातळी नियंत्रणासाठी नदीपात्रात जादा पाणी सोडण्याची शक्यता आहे. यामुळे नदीच्या पाणी पातळीत वाढ होणार असलेने नदी पात्राजवळील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देणेत येत आहे. तरी नदी काठावरील गावातील नागरिकांनी सावधानता बाळगावी असे आवाहन करण्यात आले आहे.

सद्या कोयना धरण छत्रपती शिवाजी महाराज जलसागर पाणलोट क्षेत्रातील पाणी साठा ८० टक्के झाला असताना ८५ टिएमसी झाला आहे. तर पाणी पातळी २१४६.०६ फूट झाली असून येणाऱ्या पाण्याची आवक पहाता पाणी पातळी नियंत्रणात ठेवण्यासाठी काल बुधवार सकाळी ८वा. पायथा विद्युतगृहातून १०५० क्युसेक तर आज गुरुवार सायंकाळी ५ वा. धरणाचे वरील सहा वक्र दरवाजातून ५०७८ क्युसेक्स असे एकूण ६१२९ क्युसेक्स पाण्याचा विसर्ग कोयना नदीपात्रात सोडण्यात येत आहे.

# नीट पेपर तपासणी घोटाळ्याचे दावे खोटे; हायकोर्टाने फेटाळल्या याचिका

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था:–**

नीट फेरपरीक्षेच्या पेपर तपासणीत घोटाळा झाला असून चुकीच्या मुल्यांकनामुळे गुण कमी मिळाल्याचा दावा करणाऱ्या चार विद्यार्थ्यांच्या याचिका निराधार ठरवत मुंबई हायकोर्टाच्याछत्रपती संभाजीनगर खंडपीठाने गुरुवारी फेटाळून लावल्या. ऋचा देशपांडे, सोहम गावटे, अथर्व जगताप आणि राहुल नाग यांनी स्वतंत्र याचिका दाखल करून त्यांनी प्रश्नांची उत्तरे बरोबर लिहूनही त्यांना कमी गुण मिळाल्याचा दावा केला होता. नीट पेपरफुटी विरोधात देशभरात आंदोलन सुरु असताना या दाव्यामुळे खळबळ माजली होती.

आरोपांची सत्यता पडताळण्यासाठी हायकोर्टाने चारही विद्यार्थ्यांच्या मुळ उत्तरपत्रिका न्यायालयात मागवल्या होत्या. या याचिकांवर एकत्रित सुनावणी घेण्यात आली. भारत सरकार व NTAच्या वतीने ड. रोहित सर्वज्ञ यांनी मुळ उत्तरपत्रिका न्यायालयासमोर सीलबंद पाकीटात सादर करून छढ- ची गुणांकन प्रक्रिया आणि निकाल अचूक असल्याचा युक्तिवाद केला. न्या. नितीन बी. सूर्यवंशी व ए. डी. शिंदे यांच्या खंडपीठाने मुळ उत्तर पत्रिका स्वतः तपासल्या असता उत्तरपत्रिकेतील उत्तर आणि जाहीर निकाल यामध्ये यात कोणतीही चूक नसल्याचे स्पष्ट झाले.

# जिल्हा बँक निवडणुकीची रंगीत तालीम सुरू

## आखाडे येथील घडामोडींनी राजकीय समीकरणांना वेग

**सातारा/प्रतिनिधी:–**

सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील विविध विकास सोसायट्यांमध्ये ठराव मंजुरीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली असून, त्यातून स्थानिक पातळीवरील राजकीय हालचालींनाही वेग आला आहे. आखाडे गावात ठरावाच्या प्रक्रियेदरम्यान निर्माण झालेल्या घडामोडींनी निवडणुकीतील राजकीय चुरस अधिक स्पष्ट केली.

ठरावाच्या प्रक्रियेदरम्यान दोन गटांमध्ये मतभेद निर्माण झाल्याने काही काळ वातावरण तणावपूर्ण बनले. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलिसांचा बंदोबस्तही ठेवण्यात आला. या घडामोडीची माहिती मिळताच सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी घटनास्थळी धाव घेत संबंधित पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी चर्चा केली.

पान ४ वर



# आरोग्यमंत्र्यांच्या जिल्ह्यातच अवैध गर्भपात करणारा सिव्हिल सर्जन गजाआड

**कोल्हापूर/प्रतिनिधी:–**

कोल्हापूर शहर आणि जिल्ह्यात अवैध गर्भलिंग निदान आणि बेकायदेशीर गर्भपात करणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश करण्यात आला. कोल्हापुरात कदमवाडी रोड येथील 'प्रतिमा हॉस्पिटल'चे संचालक डॉ. चंद्रकांत गुंडा गायकवाडला बेकायदेशीर गर्भपात करताना रंगेहाथ पकडण्यात आलं आहे. आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याच जिल्ह्यात गर्भपाताची कारवाई झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. डॉ. चंद्रकांत गुंडा गायकवाडने पोलादपूर, मुंबई, सिंधुदुर्ग, रायगड, रत्नागिरी आणि बीड येथे सिव्हिल सर्जन (जिल्हा शल्यचिकित्सक) म्हणून जबाबदारी पार पाडली आहे. तसेच सेंट जॉर्ज हॉस्पिटल, मुंबई येथे अतिरिक्त अधीक्षक आणि पुण्यात सहाय्यक संचालक म्हणूनही त्याने काम पाहिले आहे. अशा हायप्रोफाईल डॉक्टर गर्भपात रॅकेट सापडल्याने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

या धाडीदरम्यान पोलिसांनी बेकायदेशीर गर्भपातासाठी वापरले जाणारे पोर्टेबल सोनोग्राफी मशीन, गर्भपाताची औषधे आणि इतर वैद्यकीय



उपकरणे जप्त केली आहेत. प्राथमिक चौकशीदरम्यान आरोपी डॉ. चंद्रकांत गायकवाड याने आतापर्यंत तब्बल २०० ते २५० बेकायदेशीर गर्भपात केल्याची धक्कादायक कबुली पोलिसांना दिली आहे. पोलिसांनी आरोपी डॉ. गायकवाड याला अटक करण्याची प्रक्रिया सुरू केली असतानाच अचानक त्याची प्रकृती बिघडल्याने त्याला छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय (उझठ), कोल्हापूर येथे आंतररुग्ण (खपर्रीेंळशपीं) म्हणून दाखल करण्यात आले आहे. आरोपीला न्यायालयासमोर हजर करून त्याची पोलीस कोठडी मंजूर करून घेण्याची प्रक्रिया सुरू आहे.

२६ जुलै रोजी करवीर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रवींद्र कळमकर यांच्या पथकाने कळंबा येथील 'श्री स्टार लॉज'वर धाड टाकून बेकायदेशीर गर्भलिंग चाचणी करणाऱ्या रेकॉर्डवरील आरोपी स्वप्नील केरबा पाटीलला अटक केली होती. याप्रकरणी करवीर पोलीस ठाण्यात विविध कलमांखाली गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान पोलीस कोठडीत असलेल्या आरोपी अश्विनी गजानन शिंदेनं अत्यंत महत्त्वाचा खुलासा केला. स्वप्नील पाटीलकडून लिंगनिदान करून घेतल्यानंतर ज्या महिलांच्या पोटात मुलगी असल्याचे स्पष्ट व्हायचे, अशा महिलांचा गर्भपात भीम नगर हाऊसिंग सोसायटी, कदमवाडी रोड, कोल्हापूर येथील 'प्रतिमा हॉस्पिटल'मध्ये डॉ. चंद्रकांत गायकवाडमार्फत केला जात असल्याचे तिने पोलिसांना सांगितले.

# तासवडे एमआयडीसीत विजेच्या तारांत अडकून बिबट्याचा मृत्यू

## पहाटेच्या सुमारास उपकेंद्रातील डीपीवर आढळला मृतदेह;वनविभागाने वीजपुरवठा बंद करून बिबट्याला खाली उतरवले

**कराड/प्रतिनिधी:–**

तासवडे (ता. कराड) एमआयडीसी परिसरात बिबट्याचा वावर पुन्हा एकदा अधोरेखित झाला असून, महावितरणच्या वीज उपकेंद्रातील डीपीवर अडकून बिबट्याचा मृत्यू झाल्याची घटना आज पहाटेच्या सुमारास घडली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, एमआयडीसी परिसरातील वाढत्या वन्यजीव वावराचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

तासवडे एमआयडीसीतील महावितरणच्या वीज उपकेंद्रात आज पहाटे सुमारे तीन वाजण्याच्या सुमारास अचानक मोठा आवाज झाला. उपकेंद्रातील रात्रपाळीच्या कर्मचाऱ्यांनी तत्काळ पाहणी केली असता, वीज वितरण यंत्रणेतील डीपीवर विजेच्या तारांमध्ये बिबट्या अडकलेल्या अवस्थेत दिसून आला. मात्र, त्याचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले.

### एमआयडीसीत बिबट्याचा वारंवार वावर

तासवडे एमआयडीसी परिसरात यापूर्वीही अनेकदा बिबट्याचा वावर आढळून आला आहे. एमआयडीसीतील विविध कंपन्यांच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्येही बिबट्या कैद झाल्याचे प्रकार समोर आले आहेत. त्यामुळे औद्योगिक वसाहतीत काम करणारे कर्मचारी, तसेच परिसरातील नागरिकांमध्ये बिबट्याच्या वावराबाबत कायमच सतर्कतेचे वातावरण असते.



घटनेची माहिती मिळताच वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. बिबट्या विजेच्या तारांमध्ये अडकलेला असल्याने सुरक्षेच्या दृष्टीने प्रथम वीजपुरवठा बंद करण्यात आला. त्यानंतर आवश्यक खबरदारी घेत वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी पहाटे सुमारे पाच वाजण्याच्या सुमारास मृत बिबट्याला डीपीवरून खाली उतरवले.

पान ४ वर

### जिद्द..

चळवळ उभी कराया
आगळी असावी जिद्द
शुध्द हेतू असेल तरचं
आंदोलन खरे प्रसिद्ध
बरोबर असणारे कधी
आतूनअसती विरूध्द
पोखरू पाहेआंदोलन
कंटक करती अवरुद्ध
आंदोलनास हवीदिशा
आखणीहवीआवशुद्ध
चर्चेला बसणारे सगळे
हवे अंतर्मनी धारेशुध्द
समोरचे असे चाणाक्ष
कधी न समजे निर्बुंध्द
विमर्श करतअसताना
चौकटीत असावे बध्द
संभाषणी तोल सावरा
आवरे जरी आत क्रुद्ध
अवास्तव मागावे कसे
मागण्याहवी बांधेशुध्द
समोरचा रे आपापल्या
संस्थेशीजुळे अतिबध्द
कुणीतरी मध्यस्थ हवा
संतुलित न् आज्ञाशुध्द
होऊ शकेल रे सिध्दता
सहजसाध्य कार्य रुध्द
किंमत ये आंदोलनांस
नकोमुळी अयत्नसिद्ध
– हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६

# ईश्वरपूर नगरपालिकेचे नगराध्यक्ष मलगुंडेयांच्या अपात्रतेला स्थगिती

**ईश्वरपूर/प्रतिनिधी:–**

ईश्वरपूर नगरपालिकेचे नगराध्यक्ष आनंदराव मलगुंडे व त्यांचे बंधू नगरसेवक सुनील मलगुंडे यांच्या अपात्रतेला नगरविकास उपसचिवांकडून पुढील सुनावणीपर्यंत स्थगिती दिली आहे.

अपात्रतेच्या आदेशाविरोधात राज्यशासनाकडे दाखल केलेल्या अपील अर्जावर नगरविकास विभागाने महत्त्वपूर्ण आदेश जारी केला आहे.

जिल्हाधिकारी, सांगली यांनी महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ४४(१) अन्वये ईश्वरपूरचे नगराध्यक्ष आनंदराव मलगुंडे व नगरसेवक सुनिल मलगुंडे यांना अवैध बांधकाम प्रकरणी १० जुलै रोजी अपात्र केले होते. त्यामुळे आ.जयंत पाटील यांना धक्का बसला होता. अपात्रतेच्या आदेशा विरोधात आनंदराव मलगुंडे व सुनिल मलगुंडे यांनी राज्यशासनाकडे अपील अर्ज दाखल केला होता. दरम्यान या प्रकरणी आमदार जयंतराव पाटील यांनी नगराध्यक्ष आनंदराव मलगुंडे व नगरसेवक सुनील मलगुंडे यांच्यासमवेत उपमुख्यमंत्री व



नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन संपूर्ण प्रकरणाची माहिती देत मलगुंडे बंधूंची बाजू मांडली होती.

राज्यशासनाकडे दाखल केलेल्या अपील अर्जावर उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ संभाजी शिंदे यांच्या समक्ष गुरुवार दि. ३० जुलै रोजी सुनावणी निश्चित करण्यात आली होती. या सुनावणीकडे ईश्वरपूर शहरासह वाळवा तालुक्यातील राजकीय वर्तुळातून लक्ष लागले होते. मात्र अपरिहार्य कारणास्तव ही सुनावणी पुढे ढकलण्यात आल्याचे नगरविकास

पान ४ वर







# एक दिवस बळीराजासाठी..अधिकारी असलो तरी हाडाचे शेतकरी

## हातात कासरा,बैलजोडी आणि चिखल.. प्रांताधिकारी,तहसिलदार,पत्रकारांनी केली भात लागण

**पाटण/प्रतिनिधी:–**

पाटण तालुक्यात बळीराजाची भातलागणीची लगबग सर्वत्र सुरू असताना प्रशासन महसूल विभागातील प्रांताधिकारी सोपान टोंम्पे, तहसिलदार अनंत गुरव यांच्यासह पत्रकारांनी एक दिवस बळीराजासाठी देत बोंद्री या गावी शेतात बळीराजा बरोबर भात लागण केली. स्वतः प्रांताधिकारी यांनी बैल जोडीचे औत हाणुन चिखल मळणी करत हाडाचा शेतकरी असल्याची अनुभूती दिली. यांसह तहसिलदार यांनी भात तरु काढून चिखलात लागण केली. या भात लागणीत प्रांताधिकारी, तहसिलदार आणि पत्रकार हे भात लावणीच्या कामात शेतकऱ्यांबरोबर समरुप झाल्याने शेतात आपल्या सोबत काम करतानाचा क्षण आठवणीत कायम राहिल याचे समाधान देऊन गेले.

एक दिवस बळीराजासाठी या उपक्रमांतर्गत पाटणचे प्रांताधिकारी सोपान टोंम्पे, तहसिलदार अनंत गुरव आणि पत्रकार यांनी बोंद्री येथील शेतकऱ्यांच्या बरोबर शेतात भात लागण करत शेतकऱ्यांबरोबर काम करण्याचा आनंद घेतला. शेतात प्रत्येक्षात काम करताना शेतकऱ्यांना कराव्या लागणाऱ्या कष्टाची जाणीव प्रत्येकाच्या मनात उमटत असताना प्रत्येकाने तेवढ्यातच स्वभावनेने काम करत स्वतः प्रांताधिकारी, तहसिलदार व पत्रकारांनी चिखल मळणी केली. शेतकरी महिलांच्या बरोबर भाताचे तरु काढले. काढलेल्या तरुची लागण केली. चिखलाने बांधही धरले शेतात दिवस सर्वांना वेगळा आनंद देऊन गेला.

दुपारच्या न्यारीच्या वेळेला शेतकऱ्यांसोबत बांधावर बसून नाचणीची भाकरी, मिर्चीचा ठेचा, झुणका चटणीचा आस्वाद यावेळी सर्वांनी घेतला. एक दिवस बळीराजासाठी हा स्तुत्य उपक्रम असून यातून शेतकऱ्यांच्या कष्टाची जाणीव होते. आपण सर्वच शेतकरी असून नोकरी, व्यवसाय अन्य कारणांमुळे अलिकडच्या पिढीचे शेतीकडे दुर्लक्ष झाले आहे. यानिमित्ताने सर्वांना शेतातील कामाचा प्रत्यक्ष अनुभव घेता येईल. आणि आजच्या पिढीला शेतीची ओळख होईल. शहरातील विद्यार्थ्यांना आज देखील शेतीची ओळख नाही. त्यांच्यासाठी शैक्षणिक अभ्यासासाठी द्यावा लागतो. हे दुर्दैव आहे. यामुळे एक दिवस बळीराजासाठी हा उपक्रम सर्वत्र राबविला तर किमान यानिमित्ताने शेतीची ओळख सर्वांना होईल. आणि शेतकऱ्यांसोबत शेतातील कामाचा खरा आनंद घेता येईल. असे यावेळी बोलताना प्रांताधिकारी सोपान टोंम्पे, तहसिलदार अनंत गुरव यांनी सांगितले. एक दिवस बळीराजासाठी या उपक्रमात प्रशासकीय अधिकाऱ्यांसोबत पत्रकार जालिंदर सत्रे, शंकर मोहिते, विक्रांत कांबळे, नितीन खैरमोडे, विद्या म्हासुर्णेकर, ग्राम महसूल अधिकारी शितल जाधव, बोंद्री गावचे कोतवाल दिपक भोळे, पोलिस पाटील सिताराम पवार, अरविंद भोळे, ग्रामस्थ शंकर पवार, रोहित भोळे, निलकंठ पवार, सदाशिव पवार आदींची उपस्थिती होती.

# संपादकीय

## संसदेतील घोषणाबाजी

भारतीय संसदेचे वैशिष्ट्य म्हणजे ते केवळ कायदे करण्याचे व्यासपीठ नसून राष्ट्राच्या विचारविश्वाचे प्रतिबिंब असते. तेथे उच्चारला जाणारा प्रत्येक शब्द केवळ राजकीय नसतो; तो सामाजिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक परिणाम घडवणारा असतो. त्यामुळे संसदेत एखाद्या ऐतिहासिक ग्रंथाचा, धार्मिक परंपरेचा किंवा वैचारिक संस्थेचा उल्लेख झाला की त्याभोवती निर्माण होणारे वाद हे केवळ शब्दांचे नसतात, तर देशाच्या सामूहिक स्मृतीचे आणि वर्तमान राजकारणाचेही असतात. राज्यसभेत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी परीक्षा सुरक्षा सुधारणा विधेयकावरील चर्चेदरम्यान मनुस्मृतीचा उल्लेख केला आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर आरोप केला. त्यानंतर सत्ताधारी आणि विरोधी पक्षांमध्ये तीव्र वाद निर्माण झाला. सत्ताधारी सदस्यांनी त्यांच्या विधानाला आक्षेप घेतला, तर विरोधी पक्षाने संदर्भग्रंथांचा आधार देत आपली बाजू मांडण्याचा प्रयत्न केला. अखेरीस सभापतींनी काही नोंदी कामकाजातून वगळण्याचा निर्णय घेतला. परंतु या संपूर्ण गदारोळात देशातील परीक्षा व्यवस्थेचे सातत्याने होणारे अपयश आणि लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याचा प्रश्न हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न मागे पडला.

खरगे यांनी आपल्या भाषणाची सुरुवात नीटसारख्या राष्ट्रीय परीक्षांमधील वारंवार होणाऱ्या पेपरफुटीच्या उल्लेख करून केली होती. त्यांनी सरकारवर आरोप केला की, वारंवार दिलेल्या आश्वासनांनंतरही परीक्षा प्रणाली सुरक्षित करण्यात सरकार अपयशी ठरले आहे. २०१५, २०१६, २०२१ आणि २०२६ या कालावधीत विविध परीक्षांमध्ये झालेल्या गैरप्रकारांचा उल्लेख करत त्यांनी जबाबदारी निश्चित करण्याची मागणी केली. हा मुद्दा वस्तुतः अत्यंत गंभीर आहे. लाखो विद्यार्थी वर्षानुवर्षे अभ्यास करून स्पर्धा परीक्षांना सामोरे जातात. त्यांच्या मेहनतीवर पाणी फिरवणारी पेपरफुटी ही केवळ प्रशासकीय चूक नसून सामाजिक अन्याय ठरते. मनुस्मृती हा भारतीय इतिहासातील सर्वाधिक चर्चिला गेलेला आणि सर्वाधिक वादग्रस्त ग्रंथ आहे. काहीजण त्याकडे तत्कालीन सामाजिक व्यवस्थेचे दस्तऐवज म्हणून पाहतात, तर काहीजण त्यातील जातीय आणि स्त्रीविषयक तरतुदींवर कठोर टीका करतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही मनुस्मृतीतील अनेक विचारांना तीव्र विरोध दर्शवला होता. दुसरीकडे अनेक अभ्यासकांचे मत आहे की आज उपलब्ध असलेल्या मनुस्मृतीच्या विविध आवृत्त्यांमध्ये परस्परविरोधी श्लोक आढळतात आणि कोणती आवृत्ती मूळ आहे याबाबतही मतभेद आहेत. त्यामुळे कोणत्याही श्लोकाचा संदर्भ देताना शास्त्रीय अचूकता आणि मूळ स्रोत महत्त्वाचा ठरतो. याच मुद्द्यावर राज्यसभेत आक्षेप घेण्यात आला. सत्ताधारी सदस्यांनी खरगे यांनी उद्धृत केलेले विधान मनुस्मृतीत नसल्याचा दावा केला. त्यानंतर विविध ग्रंथ, भाषांतर आणि संदर्भ मांडले गेले. हा वाद केवळ राजकीय राहिला नाही; तो इतिहासलेखन, प्राचीन साहित्य आणि संदर्भनिष्ठ वाचनाशी जोडला गेला.

लोकशाहीत संसदेचे महत्त्व स्वाभाविक आहे. परंतु इतिहासाचा वापर राजकीय हत्यार म्हणून केला जाऊ लागला की तथ्यांची जबाबदारी अधिक वाढते. कोणत्याही ग्रंथावर टीका करण्याचा अधिकार लोकशाहीत प्रत्येकाला आहे; त्याचप्रमाणे त्या टीकेतील संदर्भांची पडताळणी करण्याचाही अधिकार इतरांना आहे. त्यामुळे अशा प्रसंगी घोषणाबाजीपेक्षा अभ्यासपूर्ण चर्चा अधिक आवश्यक असते. रा. स्व. संघाचा उल्लेख करून खरगे यांनी विचारधारेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यावर भाजप आणि संघाशी संबंधित विचारसरणीचे समर्थन करणाऱ्या सदस्यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली. भारतातील राजकारणात संघ हा अनेक दशकांपासून वादाच्या केंद्रस्थानी राहिला आहे. समर्थकांच्या मते, संघ राष्ट्रनिर्मितीसाठी कार्य करणारी स्वयंसेवी संस्था आहे, तर टीकाकारांच्या मते संघाची सांस्कृतिक राष्ट्रवादाची भूमिका अनेकदा वादग्रस्त ठरते. त्यामुळे संसदेतील हा संघर्ष दोन वेगवेगळ्या वैचारिक दृष्टिकोनांमधील केंद्रबिंदू बनतो. मात्र या संघर्षात विद्यार्थी, बेरोजगार तरुण आणि सामान्य नागरिक कुठे आहेत ? देशातील लाखो युवकांना इतिहासातील वादांपेक्षा नोकरीची संधी, पारदर्शक परीक्षा आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण अधिक महत्त्वाचे वाटते. परीक्षा सुरक्षा सुधारणा विधेयकाचा उद्देश परीक्षा प्रक्रियेला अधिक सुरक्षित बनवणे हा आहे. परंतु केवळ कठोर शिक्षा किंवा नवीन कायदे पुरेसे नसतात. डिजिटल सुरक्षा, प्रश्नपत्रिका तयार करण्याची प्रक्रिया, वाहतूक, डेटा संरक्षण, स्वतंत्र लेखापरीक्षण आणि जबाबदारी निश्चित करणारी पारदर्शक यंत्रणा यांचीही तितकीच आवश्यकता आहे. अन्यथा गैरप्रकार सुरू राहतात.

या घटनेत एक महत्त्वाचा पैलू म्हणजे, संसदीय चर्चेची गुणवत्ता. संसद ही घोषणाबाजीची स्पर्धा नसून तर्कशुद्ध संवादाची संस्था आहे. विरोधकांनी सरकारला कठोर प्रश्न विचारणे ही त्यांची लोकशाहीतील जबाबदारी आहे. त्याचप्रमाणे सरकारनेही तथ्याधारित उत्तर देणे, चुकीचे संदर्भ असल्यास पुराव्यासह दुरुस्ती करणे आणि मूळ विषयावर सविस्तर चर्चा करणे अपेक्षित असते. अनेकदा चर्चेचा केंद्रबिंदू मूळ प्रश्नापासून दूर जातो. आज देशात शिक्षण, रोजगार, महागाई, आरोग्य आणि सामाजिक समता यांसारखे अनेक गंभीर प्रश्न आहेत. संसदेत या विषयांवर दीर्घकालीन उपाययोजना चर्चिल्या जाण्याची अपेक्षा असते. पण अनेकदा एखाद्या शब्दावर, वाक्यावर किंवा ऐतिहासिक संदर्भावर खूप वेळ खर्च होतो आणि मूळ प्रश्न बाजूलाच राहतो. मनुस्मृतीवरील मतभेद भविष्यातही राहतील. संसदेत त्याचा उल्लेख होऊ नये असे नाही; परंतु तो उल्लेख देशासमोरील ज्वलंत प्रश्नांवरील चर्चेला झाकोळून टाकणारा ठरू नये. भारतीय संविधानाने मनुस्मृती नव्हे तर संविधानिक मूल्यांना सर्वोच्च स्थान दिले आहे. राज्यसभेतील हा वाद कदाचित काही दिवसांत विस्मरणात जाईल. परंतु विद्यार्थ्यांच्या भविष्यावर परिणाम करणारे प्रश्न, परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी आणि शिक्षणातील असमानता सहज विसरता येणार नाही. संसदेतील गदारोळ देशातील युवकांच्या भविष्याबद्दल चर्चा करीत नाही.

इतिहासावरील मतभेद लोकशाहीत असू शकतात; परंतु वर्तमानातील समस्यांकडे दुर्लक्ष करता येत नाही. संसदेत प्रत्येक वादाचा शेवट घोषणाबाजीतच झाला, तर लोकांचा विश्वास कमी होण्याचा धोका वाढतो. उलट, तथ्याधारित संवाद, ऐतिहासिक संदर्भांची शास्त्रीय पडताळणी आणि वर्तमानातील समस्यांवर ठोस उपाययोजना यांचा संगम घडला, तर संसद लोकशाहीच्या अपेक्षांना अधिक समर्थपणे न्याय देऊ शकेल. शेवटी, या घटनेने एक गोष्ट पुन्हा अधोरेखित केली आहे, राजकारणात प्रतीकांची लढाई जितकी महत्त्वाची मानली जाते, तितकीच महत्त्वाची वास्तवातील समस्यांची उत्तरेही आहेत. विद्यार्थ्यांना घोषणाबाजी नको आहे; त्यांना सुरक्षित परीक्षा हव्यात. समाजाला वैचारिक संघर्षाची जाणीव आहे; पण त्याहून अधिक गरज आहे जबाबदार शासन, अचूक तथ्ये आणि विधायक संसदीय संवादाची. जेव्हा इतिहासाचा संदर्भ वर्तमान सुधारण्यासाठी वापरला जातो, तेव्हा लोकशाहीचा खरा विजय होतो.

# अन्नदानाची चौकशी की लोकशाहीवरील संशय ?

**लोकशाही व्यवस्थेत कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांना चौकशी करण्याचा अधिकार असतो. त्याच वेळी नागरिकांना शांततापूर्ण आंदोलन करण्याचा, मानवतावादी मदत करण्याचा आणि न्यायालयाचे दरवाजे ठोठावण्याचाही घटनात्मक अधिकार आहे. त्यामुळे दिल्लीतील जंतर-मंतरवरील विद्यार्थी आंदोलनादरम्यान आंदोलकांना मोफत अन्नवाटप करणाऱ्या जुनैदची गाझियाबाद पोलिसांकडून झालेली चौकशी आणि त्यानंतर सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेली याचिका या दोन्ही घटनांकडे केवळ राजकीय चष्म्यातून नव्हे, तर संविधान, नागरिकांचे अधिकार आणि कायद्याच्या चौकटीतून पाहण्याची गरज आहे.**





**अशोक सुतार**

कृष्णाकाठ...

विद्यार्थी आंदोलनादरम्यान जुनैदने आंदोलकांना अन्नदान केले. त्यानंतर या अन्नवाटपासाठी निधी कुठून आला, याबाबत पोलिसांनी चौकशी सुरू केली. पोलिसांच्या म्हणण्यानुसार ही नियमित तपास प्रक्रिया आहे. दुसरीकडे, जुनैद आणि त्याच्या कुटुंबीयांनी पोलिसांकडून त्रास दिल्याचा आरोप केला असून, या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. याचिकेत कायदेशीर प्रक्रियेचे पालन न करता वागणूक दिल्याचा आणि कुटुंबीयांवर दबाव आणल्याचा आरोप करण्यात आला आहे. या आरोपांची सत्यता तपासणे हे न्यायालयीन प्रक्रियेचे काम आहे. या प्रकरणात सर्वात महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, चौकशीची गरज आणि चौकशीची पद्धत यामध्ये संतुलन राखले जात आहे का ?

जर एखाद्या आंदोलनादरम्यान मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार झाले असतील किंवा संशयास्पद निधी वापरल्याची विश्वसनीय माहिती असेल, तर त्याची चौकशी करणे हे तपास यंत्रणांचे कर्तव्य आहे. मात्र, अशा चौकशीसाठी कायदेशीर आधार, पुरावे आणि समान निकष असणे तितकेच आवश्यक आहे. चौकशी ही निवडक किंवा भेदभावपूर्ण असल्याचा आभास निर्माण झाला, तर नागरिकांचा संस्थांवरील विश्वास कमी होऊ शकतो. या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा संदर्भही महत्त्वाचा आहे. नीट पेपरफुटी आणि परीक्षा व्यवस्थेतील त्रुटींविरोधात देशभरात विद्यार्थ्यांनी आंदोलन केले. त्या आंदोलनादरम्यान पोलिसांच्या कारवाईबाबत विविध आरोप झाले. त्यानंतर केंद्र सरकारने परीक्षा सुरक्षेसाठी कायदेशीर उपाययोजना करण्याची प्रक्रिया सुरू केली. या घटनांमुळे विद्यार्थी आंदोलन हे राष्ट्रीय चर्चेचा विषय बनले.


अशा परिस्थितीत आंदोलनादरम्यान स्वयंसेवकांनी केलेल्या अन्नदानाची चौकशी का होत आहे, हा प्रश्न काही जण उपस्थित करत आहेत. दुसरीकडे, कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांचे म्हणणे असे असू शकते की, कोणत्याही आर्थिक व्यवहाराची माहिती मिळाल्यास त्याची पडताळणी करणे हा त्यांचा नियमित अधिकार आहे. त्यामुळे या दोन भूमिकांमध्ये संतुलन राखणे आवश्यक आहे. या प्रकरणात काही राजकीय प्रतिक्रिया अशा स्वरूपाच्या आहेत की, विशिष्ट धर्म किंवा समुदायातील व्यक्तींना प्रशासन जाणीवपूर्वक लक्ष्य करत आहे. अशा शंका सार्वजनिक चर्चेत व्यक्त होत असल्या तरी, त्या वस्तुस्थिती म्हणून मांडण्यासाठी ठोस आणि पडताळता येण्याजोगे पुरावे आवश्यक असतात. लोकशाहीत अशा आरोपांची निष्पक्ष चौकशी होणे आणि न्यायालयीन परीक्षण होणे हेच योग्य माध्यम आहे. पुराव्याशिवाय कोणत्याही समुदायाविषयी किंवा संस्थेविषयी व्यापक निष्कर्ष काढणे टाळणे आवश्यक आहे.

या घटनेने आणखी एक मूलभूत प्रश्न उपस्थित केला आहे. आंदोलनाच्या काळात नागरिकांनी केलेली सामाजिक मदत संशयाच्या भोवऱ्यात अडकू लागली, तर भविष्यात मानवतावादी उपक्रमांवर त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो. पूर, दुष्काळ, आंदोलन किंवा आपत्तीच्या काळात हजारो स्वयंसेवक स्वतःच्या खर्चाने किंवा लोकवर्गणीतून मदतकार्य करतात. अशा मदतकार्याची चौकशी करावी लागलीच, तर ती पारदर्शक, सन्मानपूर्वक आणि कायदेशीर प्रक्रियेनुसार व्हावी, हीच लोकशाहीची अपेक्षा आहे. दुसरीकडे, नागरिकांनीही आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता राखणे आवश्यक आहे. निधी कुठून आला, कसा खर्च झाला आणि त्याची नोंद काय आहे, याबाबत स्पष्ट माहिती उपलब्ध असल्यास अनावश्यक संशय निर्माण होण्याची शक्यता कमी होते. जुनैदच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालय काय भूमिका घेते, याकडे देशाचे लक्ष लागले आहे. न्यायालयासमोर पोलिसांची बाजूही मांडली जाईल आणि याचिकाकर्त्याचे आरोपही तपासले जातील. अंतिम निष्कर्ष न्यायालयीन प्रक्रियेनंतरच स्पष्ट होईल.

लोकशाहीमध्ये आंदोलन, प्रश्न विचारणे, प्रशासनाची चौकशी आणि न्यायालयीन हस्तक्षेप ही सर्वच प्रक्रिया संविधानाने मान्य केलेली आहे. त्यामुळे या प्रकरणात भावनिक किंवा राजकीय प्रतिक्रिया देण्यापेक्षा कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होऊ देणे अधिक योग्य ठरेल. या घटनेचा सर्वात मोठा संदेश असा आहे की, राज्यसत्ता आणि नागरिक यांच्यातील विश्वास टिकवून ठेवणे ही दोघांचीही जबाबदारी आहे. तपास यंत्रणांनी कायद्याच्या चौकटीत निष्पक्षपणे काम केले पाहिजे, तर नागरिकांनाही पारदर्शकतेचे पालन करावे लागेल. न्याय, समानता आणि घटनात्मक मूल्ये यांच्यावरच लोकशाहीचा पाया उभा असतो. त्या पायाला संशय नव्हे, तर निष्पक्षता आणि उत्तरदायित्वाची गरज आहे.

# ग्रामीण जीवनाचे खरे चित्रकार : मुंशी प्रेमचंद

**प्रा.डॉ.दिलीपकुमार कसबे**
**कराड**



हिंदी भाषेतील ग्रामीण जीवनाचे खरे चित्रकार कोण असतील तर ते आहेत प्रसिद्ध साहित्यिक प्रेमचंद. ३१जुलै १८८० साली बनारस (वाराणसी) जवळील लमही नावाच्या छोट्याशा खेड्यात त्यांचा जन्म झालेला होता. जुलै महिना आला की हिंदी व उर्दू भाषेतील थोर साहित्यिक कादंबरीकर म्हणून ज्यांचे नाव घेतल्याशिवाय हिंदी कादंबरीवर प्रकाश टाकताच येत नाही असे ते थोर कादंबरीकार,कथाकार यांची उत्तर भारतच नाही तर जगातील ज्या ज्या शाळेत, महाविद्यालयात, विद्यापीठात हिंदी विषय शिकविला जातो त्या त्या ठिकाणी प्रेमचंद जयंती उत्सव सप्ताह, पंधरावाडा अशा स्वरूपात साजरा केला जातो. यामध्यामातून वेगवेगळ्या स्पर्धा,प्रेमचंद यांच्या जीवन व साहित्य यामधून देश समाज शेतकरी यांना नेमका कोणता संदेश मिळतो यावरती व्याख्यानाचे आयोजन केले जात असते.

प्रेमचंद यांचे मूळ बालपणीचे नाव धनपतराय असे होते. त्यांच्या वडिलांचे नाव अजायबराय श्रीवास्तव होय.१८९८ मध्ये ते मॅट्रिक झाले आणि पुढे त्यांनी १९१९ मध्ये अलाहाबाद विद्यापीठा मधून बी.ए.चे शिक्षण पूर्ण केले आणि१९२१ पासून त्यांची नियुक्ती सरकारी शिक्षक, निरीक्षक पदी झाली. याच काळात पुढे ८ फेब्रुवारी १९२१ मध्ये ते गांधीजी च्या एका सभेला गेले होते. इंग्रज सरकार विरूद्ध गांधीजींची असहकार चळवळ चालू होती. त्यांनी त्या सभेत सांगितले होते लोकांनी सरकारी नोकरी सोडून द्या. आपण सरकार ला सहकार्य करायचे नाही. त्याचा परिणाम प्रेमचंद यांच्या मनावर झाला व त्यांनी पुढे सरकारी नोकरीचा राजीनामा दिला.प्रारंभी ते नवाबराय या टोपण नावाने उर्दू भाषेतून लिहित होते असाच त्यांनी १९२० च्या आसपास देशप्रेमावर आधारित 'सोज वतन ' हा कथासंग्रह लिहलेला होता पण इंग्रज सरकार ला तो आवडला नाही म्हणून त्यांनी तो जप्त केला. पण त्यांचे लेखन थांबले नाही. पुढे त्यांनी हिंदी भाषेतून लिहायला सुरूवात केली. 'जमाना 'या हिंदी पत्रिकेचे संपादक मुंशीदया निगम यांनी त्यांना प्रेमचंद या नावांने लिहायला सांगितले आणि पुढे काय तर आजचे आपले मुंशी प्रेमचंद म्हणून हिंदी साहित्यातील एक अग्रगण्य अजरामर अद्वितीय साहित्यिक म्हणून ते गणले गेलेले आहेत.

हिंदी साहित्य आणि प्रेमचंद यांचे एक अतुट नाते बनलेले आहे. असेच म्हणावे लागेल. अनेक बी. ए.,एम.ए. स्पर्धा परिक्षा,नेट/सेट परिक्षा यामधून प्रेमचंद यांच्या कथा,कादंबरी जीवन या अनुषंगाने नक्कीच प्रश्न विचारले जात असतात.

मुंशी प्रेमचंद, महात्मा गांधीजींच्या असहकार आंदोलनातून एवढे प्रभावित झाले होते की पुढे त्यांनी आपल्या नोकरीचा राजीनामा देऊन शेतकरी,त्यांच्या अडचणी,ग्रामीण जीवनाचे चित्रण,सामान्य मानसांच्या वैयक्तिक,कौटुंबिक,सामाजिक जीवनात निर्माण होणाऱ्या अडचणी व प्रश्न यावर ते सातत्याने कथा,कादंबरीं च्या माध्यमातून लिहित राहिले. म्हणून एक ग्रामीण जीवन व शेतकऱ्यांच्या प्रश्नावर लिहिणारे कथा कादंबरीकार म्हणून त्याचे नाव उदयास आले.त्यांनी मनोवैज्ञानिक सत्य लोकांच्या समोर मांडलेले आहे. भारत शेतकरी आणि खेडी यांचे एक अतूट नाते आहे. यांचे चित्रण ते करायचे. त्यांच्या कथांमधील घटना,चरित्रे आणि रहस्यात्मक्ता यातील एक अनोखे चित्रण पहावयास मिळते. त्यामधून भारताचे सामाजिक सांस्कृतिक चित्रण प्रामुख्याने त्यांनी अधोरेखित करण्याचे काम केलेले आहे. त्यांनी हिंदी मधून लिहलेला पहिला कहानी संग्रह 'सप्त सरोज 'होय.आपल्या लेखन काळात ते अनेक हिंदी पत्रिकेत कार्यरत होते. हंस,जागरण,या पत्रिकांचे त्यांनी चांगले संपादन केलेले होते. जमाना,सरस्वती,माधुरी,चाँद,आणि सुधा अशा मासिक पत्रिकामधून ही त्यांनी खूप लेखन केलेले आहे.

हिंदी भाषेतून लिहलेल्या कादंबरी साहित्याचा विकास पहात असतांना त्यांना केंद्रवर्ती ठेवूनच अभ्यास करावा लागतो म्हणजे १)प्रेमचंद पूर्व हिंदी उपन्यास २)प्रेमचंद युगीन हिंदी उपन्यास ३)प्रेमचंदोत्तर हिंदी उपन्यास अर्थात कांदबरी लेखनाच्या उत्कर्षात त्यांना समोर ठेवूनच अभ्यास करावा लागतो. ते प्रथम उर्दूतून लिहित होते ' असरारे मआबिद 'ही त्यांची उर्दू कादंबरी त्याचे हिंदी रूपांतर ' देवस्थान रहस्य ' होय.' हम खुर्बाव हम सवाब '(१९०७ ई.) ही दुसरी कादंबरी होय. बनारस मधून प्रकाशित होणारे उर्दू साप्ताहिक 'आवाज ए खल्क 'मधून क्रमशः ते लेखन करत असत 'किशना '(१९०७), 'जलवाए ईसार '(१९१२), 'बाजारे हुस्न '(१९१४), ' गोशए आफिएत '(१९२२), 'चौगाने हस्ती '(१९२७), 'पर्दए मजाज'(१९२८), त्यांनी जे उर्दू नाटक लिहले ते आहेत 'कर्बला ' ' रूहानी शादी 'इ. एक जीवनी आहे -'बाकमलों के दर्शन' लहान मुलांच्या साठी ही त्यांनी उर्दू मधून १) 'कुत्ते की कहानी' २)'जंगल की कहानी ', ३) 'राम चर्चा'अशा किती तरी रचना त्यांनी लिहल्या यातील काहींचा हिंदी मधून अनुवाद ही त्यांनी केलेले आहे.

प्रेमचंद यांनी हिंदी मधून जवळ जवळ पावने तीनशे कथा लिहलेल्या आहेत ज्या ' मानसरोवर 'च्या आठ भागामधून प्रसिद्ध झालेल्या आहेत. यातील बर्याचशा कथा आठवी पासून च्या पुढील सर्व च वर्गात शिकविल्या गेलेल्या आहेत. प्रत्येक कथेमधून त्यांनी माणसांच्या जीवनातील प्रत्येक क्षणाचे चित्रण साकारण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या कथांचा अभ्यास केल्यानंतर लक्षात येते की किती बारीक नजरेने ते समाजाकडे लोकांच्याकडे पहात असायचे. त्यांच्या कथा या काल्पनिक नाहीत. त्या वाचल्यानंतर समजते की मानवी जीवनाच्या वेगवेगळ्या रूपांचे चित्रण किती हुबेहूब त्यांनी केलेले आहे. मानवी जीवनाची रूपे आणि प्रत्येक माणसाच्या जीवनातील प्रसंगानुकूल स्वभावाचे चित्रण करण्याचा किती चांगला हाथकंडा आहे. आपल्या कथांच्या माध्यमातून सामान्य दलित लोकांच्या अंतर्मानातील दु:खे,वेदना,भावना यांना आपल्या रोचक भावानुकूल भाषेच्या शैलीतून एक आवाज देण्याचा चांगला प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे हिंदी कथा साहित्य मधील त्यांच्या कथा या बेजोड आहेत. त्यांच्या गाजलेल्या अनेक कथा आहेत. त्यामध्ये ' ईदगाह', 'अलग्यौझा' ,बडे भाई साहब ',ठाकुर का कुआँ', 'मनोवृत्ती',घासवाली', 'बडे घर की बेटी',नशा',घर जमाई', 'नरक का मार्ग' 'शतरंज के खिलाडी', ' संपादक महोदय', 'कफन', 'बेटोवाली विधवा', 'धिक्कार', 'कायर', 'पूस की रात', 'पंच परमेश्वर',' डिग्री के रूपये', माता का हृदय ', 'स्वर्ग की देवी', अशा किती तरी कथा आहेत ज्या पाठकांच्या अंत:करणाचा कुठेतरी शोध घेतांना दिसतात. त्यांच्या कथा तीन प्रकार च्या आहेत. १)घटनात्मक आणि आकस्मिक २)चरित्र प्रधान आणि आदर्श ३)विचार प्रधान,चरित्रमूलक आणि भावनाप्रधान.

कादंबरी लेखनात मुंशी प्रेमचंद यांचा हाथ कोणीच धरू शकणार नाही अशा त्यांच्या कादंबर्या आहेत. त्यांनी जवळ जवळ दहा कादंबर्या लिहलेल्या आहेत. त्यामध्ये ' वरदान ' (१९२१), 'प्रेमाश्रम ' (१९२१), 'सेवासदन ' (१९१९), 'रंगभूमी (१९२५), 'कायाकल्प '(१९२८), 'निर्मला ' (१९२५), 'प्रतिज्ञा'(१९२७), 'गबन '(१९३१), ' कर्मभूमी ' (१९३२), 'गोदान '(१९३६) आणि शेवटची कादंबरी 'मंगळ सूत्र' जी शेवटी त्यांची तब्येत चांगली नसल्यामुळे पूर्ण होऊ शकली नाही. म्हणतात पुढे त्यांची पत्नी शिवरानी देवी यांनी ती पूर्ण केली. त्या ही चांगल्या साहित्यिक लेखक म्हणून प्रसिद्ध होत्या.त्यांनी आपल्या कादंबर्या मधून ग्रामीण दलित शेतकरी यांच्या जीवनाचे चित्रण करून तत्कालीन साहित्यिका मधून आपला एक वेगळा आदर्श निर्माण केलेला आहे. त्यांनी सेवासदन या कादंबरीमधून वेश्यांच्या जीवनातील अडचणी,प्रेमाश्रम मधून शेतकरीवर्गाच्या जीवनातील समस्या, निर्मला मधून हुंडा,अनमेल विवाह. रंगभूमी मधून सरकार कडून होणारा अन्याय. गबन मधून मध्यमवर्गीय लोकांच्या जीवनातील आर्थिक अडचणी. कायाकल्प मधून पारलौकिक जीवनातील समस्या. कर्मभूमी मधून हरिजन दलित वर्गातील लोकांच्या समस्या. आणि गोदान मधून शेतकऱ्यांच्या अडचणी काय असतात याला वाचा फोडण्याचे फार मोठे काम या महान साहित्यिकाने केलेले आहे असेच म्हणावे लागते. त्यांना उपन्यास सम्राट मुंशी प्रेमचंद असे म्हणतात. कारण त्यांनी काल्पनिक चित्रण करण्या ऐवजी जास्तीत जास्त वास्तववादी चित्रण केलेले आहे. स्त्रिया, विधवा, बालविवाह, हुंडाबळी, शेतकरी, दलित ,बालक, सावकार, जमीनदार इत्यादींवर प्रकर्षाने ते लिहतात. त्यांचे लेखन समस्या आणि त्याच्यावर उपाय अशा दोन्ही माध्यमातून असल्याचे दिसून येते.म्हणून त्यांच्याकडे एक आदर्शवादी लेखक म्हणून पाहिले जाते.

थोडक्यात सांगायचे मटले तर मुंशी प्रेमचंद हे हिंदी साहित्यातील एक एक महान लेखक आहेत हिंदी-उर्दू मिश्रित खडीबोली भाषेचा प्रयोग म्हणजे अतिशय सामान्यांच्या भाषेचा वापर त्यांनी आपल्या कथा कादंबरी मधून केलेला असल्यामुळे त्यांचे साहित्य हे सामान्य वाचकांपासू उच्च शिक्षित सुशिक्षिता पर्यंत पोहचल्यामुळे ते खूपच लोकप्रिय ठरले गेलेल आहे.तसेच त्यांच्या कथा कादंबरी मधून स्त्री जीवनाच्या चित्रणात स्त्रियांना फक्त बळी न दाखविता एक जिद्दी,धाडसी व विचार करणार्यां म्हणून दाखविलेल्या आहेत. त्याचबरोबर त्यांनी आपल्या कादंबरी मधून स्वातंत्र्य चळवळी चा प्रभाव ही दाखविलेला आहे. कारण ते स्वत:महात्मा गांधीजींच्या राष्ट्रीय आंदोलनातून प्रभावित झाले असल्यामुळे त्यांच्या प्रेमाश्रम,रंगभूमी या कादंबर्या मधून तसे चित्रण केलेले आहे. तर गोदान,निर्मला, गबन व सेवासदन या मधून भारताचा आत्मा शेतकरी गरीबी,कर्ज,हुंडा व जातीयता यांचे अतिशय प्रभावी असे रेखाटन केलेले आहे. मुंबई ला त्यांना सिनेसृष्टीत बोलाविले होते पण आपल्या लिखाणात होणारी मोडतोड पाहून ते माघारी गेले. त्यांच्या गोदान कादंबरी वरती टेलीफिल्म ही बनविलेली आहे. म्हणूनच म्हणावे लागते ते एक प्रामाणिक वास्तववादी,आदर्श लेखक होते. ग्रामीण जीवनातील बारीकसारीक धागे पकडून मुंशी प्रेमचंद यांनी जे बेजोड वर्णन चित्रण केलेले आहे तसे अन्यत्र मिळणे दुर्लभच म्हणावे लागेल. शेतकरी व ग्रामीण जीवनाचा खरा लेखा जोखा मांडणारे एक सशक्त लेखक म्हणून ते प्रसिद्ध आहेत.



# सातवी शिष्यवृत्ती परीक्षेत प्राची प्रदीप पुजारी सर्वप्रथम

## विद्या विकास हायस्कुल चे मोठे यश

**अचलेर/प्रतिनिधी:–**

सातवी शिष्यवृत्ती परीक्षेत प्राची प्रदीप पुजारी या विद्यार्थिनीने सर्वप्रथम येत विद्या विकास हायस्कुलला मोठे मोठे यश मिळवून दिले आहे.

लोहारा तालुक्यातील अचलेर येथील विद्या विकास हायस्कूल मधील इयत्ता ७ वी च्या वर्गात शिक्षण घेत असलेली प्राची प्रदीप पुजारी ही विद्यार्थीनी सातवी शिष्यवृत्ती परीक्षेत सर्व प्रथम आली आहे. प्राची प्रदीप पुजारी या विद्यार्थिनीने ६२+७६=१३८ असे गुण मिळवून सर्वप्रथम येण्याचा बहुमान मिळविला आहे.

मुक्ता सुरेश हडलगे ही विद्यार्थी नी ६२+७४=१३६ असे गुण मिळवून दुसरी आली आहे तर अमेरिका अनंत खंडाळकर ही विद्यार्थीनी ६०+७४=१३४ असे गुण मिळवून तिसरा क्रमांक मिळवून यश संपादन केले आहे. शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी झालेल्या सर्व विद्यार्थीनीचेग्रामस्थांमधून अभिनंदन करण्यात येत आहे

इयत्ता ७ वी मधील शिष्यवृत्ती परीक्षेत सर्व प्रथम आलेली प्राची प्रदीप पुजारी ही विद्यार्थीनी येथील सामाजिक कार्यकर्ते आणि माहिती अधिकार कार्यकर्ते व युवा उद्योजक प्रदीप पुजारी यांची कन्या आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे विद्या विकास परिवारातर्फे अभिनंदन करण्यात आले आणि सर्व विद्यार्थ्यांना शुभेछ्या देण्यात आल्या.

# मोहोळ तालुक्यातील चिंचोळी 'एमआयडीसी'त बनावट दारूची फॅक्टरी सापडली

## कारवाई संपायला लागले १२ तास ; 'एक्साईज' ने जप्त केलेल ३ कोटींचे घबाड : सर्वांत मोठी कारवाई

**सोलापूर/महेश गायकवाड:–**

मोहोळ तालुक्यातील चिंचोळी 'एमआयडीसी' येथे बनावट दारूची फॅक्टरी आढळून आली आहे ; बनावट दारू च्या फॅक्टरी वर कारवाई करण्यात आली आहे परंतु ही कारवाई संपायला तब्बल १२ तास लागले; या कारवाई वर'बोलतांना एक्साईज'च्या अधीक्षक म्हणाल्या, की १५ वर्षांतील सर्वांत ही मोठी कारवाई आहे



मोहोळ तालुक्यातील चिंचोळी एमआयडीसीतील एका गोडावूनमध्ये बनावट टँगो पंच व भिंगरी दारू बनविणारी फॅक्टरीच आढळली आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाने त्या गोडावूनवर बुधवारी (ता. २९) छापा टाकला. त्यावेळी गोडावूनमध्ये बनावट दारूसाठी आणलेले स्पिरीट, बॅरेल, बॉक्स, रिकाम्या बाटल्यांचे ढिग, मशिन आढळली. तेथून तब्बल अडीच कोटींचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

मोहोळ तालुक्यातील चिंचोळी एमआयडीसीतील एका गोडावूनमध्ये बनावट टँगो पंच व भिंगरी दारू बनविणारी फॅक्टरीच आढळली आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाने त्या गोडावूनवर बुधवारी (ता. २९) छापा टाकला. त्यावेळी गोडावूनमध्ये बनावट दारूसाठी आणलेले स्पिरीट, बॅरेल, बॉक्स, रिकाम्या बाटल्यांचे ढिग, मशिन आढळली. तेथून तब्बल अडीच कोटींचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पुणे महामार्गावरील चिंचोळी येथे जिल्ह्यातील सर्वांत मोठी एमआयडीसी आहे. काही महिन्यांपूर्वी मुंबई पोलिसांनी याच एमआयडीसीतून एमडी ड्रग्ज पावडर जप्त केली होती. त्यानंतर आता या एमआयडीसीतील गोडावूनमध्ये चक्क अवैध दारूनिर्मितीचा कारखानाच सापडला आहे. गोपनीय माहितीवरून राज्य उत्पादन शुल्क विभागाने बुधवारी सकाळी १० च्या सुमारास त्याठिकाणी छापा टाकला.

त्यावेळी बाहेरून सिमेंट कंपाउंड असलेल्या मोठ्या गोडावूनमध्ये हा सगळा प्रकार आढळला. त्या गोडावूनबाहेर दारू वाहतुकीसाठीची वाहनेदेखील होती. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधीक्षक भाग्यश्री जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सौरभ अदाटे, पोलिस निरीक्षक श्री. पाटील यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही कारवाई केली. दरम्यान, माझ्या १५ वर्षांच्या पाच जिल्ह्यांतील सेवेत ही पहिलीच मोठी कारवाई असल्याचे अधीक्षक भाग्यश्री जाधव यांनी सांगितले.

चिंचोळी एमआयडीसीतील एका गोडावूनमध्ये अवैध दारूनिर्मिती आणि दुसऱ्या दोन गोडावूनमध्ये तेथे बनविलेली दारू ठेवली होती. या गोडावूनमध्ये १४ हजार लिटर स्पिरीट (७० बॅरेल), ४७० बॉक्स दारू, सात वाहने, बॉटलिंगच्या दोन मशिन होत्या. सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी त्याच ठिकाणी होते. गोडावून कोणाचे आहे, अवैध फॅक्टरीचा सूत्रधार कोण, याची माहिती अधिकारी घेत होते. या कारवाईत सातजण निष्पन्न झाले असून, त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या गोडावूनमध्ये काम करणारे कामगार परराज्यातील, विशेषतः बिहारमधील आहेत.

राज्य उत्पादन शुल्क विभागाने काही दिवसांपूर्वी माळशिरस तालुक्यात एक ट्रक जप्त केला होता. त्यात सव्वाकोटी रुपयांचा गोवा बनावटीचा विदेशी दारूसाठा सापडला होता. या गुन्ह्यातील सूत्रधाराचा चिंचोळी एमआयडीसीतील बनावट दारूनिर्मितीशी संबंध असल्याचा राज्य उत्पादन शुल्क विभागाला संशय आहे. अवैध देशी, विदेशी दारू तयार करण्याचे कौशल्य सोलापुरातील अनेकांनी आत्मसात केले आहे. अनेक ठिकाणी त्यांचे छुपे अवैध उद्योग सुरू आहेत. या अवैध हातभट्टी निर्मितीचा एक सूत्रधार असून, त्याला शोधून काढले जाईल, असा विश्वास अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

# श्री स्वामी समर्थ मंदिर कॉरीडॉर निर्मितीला वेग

## पहिल्या टप्प्यात ५०० कोटींचा आराखडा सादर करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश

**अक्कलकोट/ महेश गायकवाड:–**

श्री स्वामी समर्थांच्या पवित्र नगरीच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण घडामोड घडली असून, दि. २९ जुलै रोजीच्या शासन निर्णयानंतर अवघ्या २४ तासांत विकास प्रक्रियेला प्रत्यक्ष गती मिळाली आहे. अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश येत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी (ता. ३०) म्हाडाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेऊन पहिल्या टप्प्यातील ५०० कोटी रुपयांच्या विकास आराखड्याची तयारी करून तो शासनाकडे तातडीने सादर करण्याचे आदेश दिले.या बैठकीला गृहनिर्माण राज्यमंत्री पंकज भोयर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, गृहनिर्माण विभागाचे अतिरिक्त सचिव असिमकुमार गुप्ता आणि म्हाडाचे उपाध्यक्ष संजीव जैस्वाल, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी आणि लोकेश चंद्रा, उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नवीन सोना तसेच म्हाडाचे इतर अधिकारी सह्याद्री राज्य अतिथी गृह येथे झालेल्या बैठकीस उपस्थित होते.



आमदार कल्याणशेट्टी यांनी अक्कलकोटचा विकास आराखडा विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून म्हाडाकडे सोपविण्याची मागणी केली होती. त्यानुसार अक्कलकोट नगरपरिषद, सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालय आणि म्हाडा यांनी शासनाकडे प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावास उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी मान्यता दिली असून, त्यासंदर्भातील शासन निर्णय दि. २९ जुलै, गुरुपौर्णिमेच्या दिवशी प्रसिद्ध करण्यात आला.

या निर्णयानंतर अवघ्या एकाच दिवसात मुख्यमंत्री फडणवीस यांनी संबंधित अधिकाऱ्यांची बैठक बोलावून विकास आराखड्याबाबत सविस्तर चर्चा केली. बैठकीत श्री स्वामी समर्थ मंदिर परिसर, श्री स्वामी समर्थ समाधी मठ परिसर आणि भाविकांसाठी आवश्यक आधुनिक सुविधा उभारण्याचा सविस्तर आराखडा तयार करून पहिल्या टप्प्यातील ५०० कोटी रुपयांच्या विकासकामांचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

तसेच, दुसऱ्या टप्प्यात श्री स्वामी समर्थ मंदिर ते श्री स्वामी समर्थ समाधी मठ या पालखी मार्गाचे सुशोभीकरण, विस्तारीकरण आणि भाविकांसाठी जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्याचा विकास आराखडाही राबविण्यात येणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. अक्कलकोटमध्ये दरवर्षी लाखो भाविक दर्शनासाठी येत असल्याने वाढत्या भाविकसंख्येच्या पार्श्वभूमीवर वाहतूक व्यवस्था, पार्किंग, स्वच्छता, पायाभूत सुविधा, धार्मिक पर्यटन आणि परिसराच्या सुशोभीकरणावर विशेष भर देण्यात येणार आहे. विकास आराखडा शासनाकडे मंजुरीसाठी सादर झाल्यानंतर पुढील प्रशासकीय प्रक्रिया वेगाने पूर्ण करून प्रत्यक्ष कामांना प्रारंभ करण्याचे नियोजन करण्यात येणार आहे.

> महायुती सरकारने अक्कलकोटच्या सर्वांगीण विकासाला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून म्हाडाची नियुक्ती झाल्यानंतर अवघ्या एका दिवसात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बैठक घेऊन ५०० कोटी रुपयांचा विकास आराखडा तयार करण्याचे आदेश दिले, ही अक्कलकोटसाठी ऐतिहासिक बाब आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे श्री स्वामी समर्थ नगरीचा विकास नव्या उंचीवर पोहोचेल. त्याबद्दल मी सर्वांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करतो.
>
> – सचिन कल्याणशेट्टी
> आमदार, अक्कलकोट

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक श्री.शशिकांत आकाराम पाटील यांनी प्रीतिसंगम प्रिंटर्स, कोयना औद्योगिक वसाहत, मलकापूर–कराड येथे छापून गोदावरी प्लाझा, हेड पोस्टाजवळ, शनिवार पेठ कराड, येथे प्रसिद्ध केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. R.N.I.No.MAHMAR./२००१/१०३३८ रजिस्टर No.MAHMAR/14511/13/1/96/Te पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 *मुख्य कार्यालय:– गोदावरी प्लाझा, हेड पोस्ट जवळ, शनिवार पेठ कराड, जि.सातारा, पिनकोड – ४१५११० फोन (०२१६४)२२७७२५,,फॅक्स २२६९२५, * सातारा कार्यालय:– संजीवन सीटी स्कॅन शेजारी, सिव्हील हॉस्पिटल रोड, सातारा फोन नं:–९२२६३९८८१७ RNI.mar/२००१/१०३३८.
email-pritisangamkarad@gmail.com

# महाबळेश्वर-तापोळा मार्ग पुन्हा वाहतुकीसाठी खुला

## तीन दिवसांच्या अथक संघर्षाला यश!;प्रशासन,लोकसहभागातून संकटावर मात

***रात्रंदिवस सुरू असलेल्या दुरुस्ती मोहिमेला यश**
*** १०५ गावांची जीवनवाहिनी पुन्हा सुरू**
*** पर्यटकांसह स्थानिकांना मोठा दिलासा**

**प्रतापगड/प्रतिनिधी:–**

अतिवृष्टीमुळे खचून सलग तीन दिवस बंद असलेला महाबळेश्वर-तापोळा हा १०५ गावांच्या दळणवळणाचा प्रमुख मार्ग अखेर वाहतुकीसाठी पुन्हा खुला करण्यात आला आहे. प्रशासन, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार आणि स्थानिक नागरिकांनी दाखविलेल्या अभूतपूर्व एकजुटीमुळे अशक्य वाटणारे काम अल्पावधीत पूर्ण झाले. या मार्गावर पुन्हा वाहतूक सुरू झाल्याने १०५ गावांतील हजारो नागरिक, विद्यार्थी, शेतकरी, व्यापारी तसेच पर्यटकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे महाबळेश्वर-तापोळा मार्गावरील अनेक ठिकाणी दरडी कोसळल्या, तर काही भागात रस्ता मोठ्या प्रमाणात खचला. त्यामुळे तापोळा आणि परिसरातील १०५ गावांचा महाबळेश्वरशी संपर्क पूर्णपणे तुटला होता. अत्यावश्यक सेवा, रुग्णवाहिका, दूध वाहतूक, किराणा, शालेय विद्यार्थ्यांची ये-जा आणि पर्यटन व्यवसायावर मोठा परिणाम झाला होता.

परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन महसूल प्रशासनाने तातडीने संपूर्ण यंत्रणा कार्यान्वित केली. तहसील प्रशासन, सार्वजनिक बांधकाम विभाग (झथऊ), महाबळेश्वर नगरपालिका, वन विभाग, १०५ गाव नियोजन समिती, पंचायत समिती, स्थानिक ग्रामस्थ आणि सामाजिक संस्थांनी एकत्रितपणे रस्ता पूर्ववत करण्यासाठी युद्धपातळीवर काम सुरू केले. अवघड भौगोलिक परिस्थिती, सतत सुरू असलेला पाऊस आणि दरड कोसळण्याचा धोका असूनही अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी ठाण मांडून काम करत राहिले.

रस्ता सुरू करण्यासाठी जेसीबी, पोकलेन, ट्रॅक्टर आणि इतर यंत्रसामग्रीच्या साहाय्याने माती, दगड आणि दरडी हटविण्याचे काम सातत्याने सुरू होते. धोकादायक भाग सुरक्षित करून आवश्यक त्या ठिकाणी तात्पुरत्या संरक्षणात्मक उपाययोजना करण्यात आल्या. वाहनचालकांना कोणताही धोका निर्माण होऊ नये यासाठी रस्त्याची विशेष तपासणी करण्यात आली.

या संपूर्ण मोहिमेत नगरसेवक आबा शिंदे यांनी सलग दोन दिवस घटनास्थळी राहून कामाचा पाठपुरावा केला. तहसीलदारांनीही स्वतः घटनास्थळी उपस्थित राहून विविध विभागांमध्ये समन्वय साधत कामाला गती दिली. प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी एकत्रितपणे घेतलेल्या निर्णयांमुळे रस्ता अल्पावधीत वाहतुकीसाठी खुला करणे शक्य झाले.

या कामात जिल्हा परिषद सदस्य अजित संकपाळ, पंचायत समिती उपसभापती संजय मोरे, विशाल संकपाळ, राम संकपाळ, भाऊ मोरे, सुभाष कारंडे, उत्तम भालेराव, लक्ष्मण शिंदे (देवळी), संपत जाधव (चिखली), किशोर जंगम (तलदेव), संजय जंगम, देवळीचे सरपंच, अशोक ढेबे, अंकुश अखाडे (कारवी आळा), राहुल भोसले, एकनाथ शेलार, राजू सकपाळ



**महाबळेश्वर-तापोळा मार्गावरील फळणे वस्तीजवळील रस्त्याचा मोठा भाग खचल्याने वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती यावेळी रस्तात पडलेली दरड मशीनने सुरु आसलेले काम (- छाया संजय चोरगे)**

(गावडोशी), गणेश भोपळे, गणेश धनावडे, समीर कदम, अजय उतेकर यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्ते आणि ग्रामस्थांनी प्रत्यक्ष घटनास्थळी उपस्थित राहून महत्त्वपूर्ण योगदान दिले. अनेकांनी स्वतःची वैयक्तिक कामे आणि व्यवसाय बाजूला ठेवून या कामात सहभाग नोंदविला.

घटनास्थळावरून माहिती देताना स्थानिक प्रतिनिधींनी सांगितले की, आता महाबळेश्वर-तापोळा मार्ग पूर्णपणे वाहतुकीसाठी खुला झाला असून पर्यटकांनी किंवा वाहनचालकांनी कोणतीही भीती बाळगण्याचे कारण नाही. प्रशासनाने आवश्यक त्या सर्व सुरक्षिततेच्या उपाययोजना केल्या आहेत. येणारी-जाणारी वाहतूक सुरळीत सुरू झाली आहे.

या संकटाच्या काळात सोशल मीडियावरून आणि वृत्त माध्यमांद्वारे सातत्याने वस्तुस्थिती लोकांपर्यंत पोहोचविणाऱ्या पत्रकार बांधवांचेही नागरिकांनी विशेष आभार मानले. अफवा आणि अप्रमाणित संदेशांवर विश्वास न ठेवता प्रशासनाच्या अधिकृत सूचनांचे पालन केल्याबद्दल नागरिकांचेही कौतुक करण्यात आले.

रस्ता सुरू झाल्यानंतर तापोळा परिसरातील पर्यटन व्यवसायाला नवसंजीवनी मिळाली आहे. काही दिवसांपासून पर्यटकांची ये-जा पूर्णपणे ठप्प झाली होती. आता वाहतूक सुरू झाल्यामुळे पर्यटन व्यवसाय, स्थानिक बाजारपेठा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला पुन्हा चालना मिळणार आहे. त्याचबरोबर विद्यार्थी, शेतकरी आणि नागरिकांचे दैनंदिन जीवनही पूर्वपदावर येण्यास मदत होणार आहे.

या संपूर्ण घटनेने संकटाच्या काळात प्रशासन, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते आणि सामान्य नागरिक एकत्र आले तर कोणतेही मोठे आव्हान पेलता येते, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. मात्र, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी महाबळेश्वर-तापोळा या १०५ गावांच्या जीवनवाहिनीचे कायमस्वरूपी आणि भक्कम पुनर्बांधणीचे काम तातडीने हाती घेण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.

### १०५ गावांसाठी दिलासादायक बातमी!

महाबळेश्वर-तापोळा हा तीन दिवस बंद असलेला प्रमुख मार्ग अखेर वाहतुकीसाठी खुला झाला आहे. प्रशासन, महाबळेश्वर नगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग (झथऊ), महसूल यंत्रणा, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार आणि ग्रामस्थ यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे १०५ गावांची जीवनवाहिनी पुन्हा सुरू झाली असून स्थानिक नागरिकांसह पर्यटकांनाही मोठा दिलासा मिळाला आहे.

# माजी मंत्री बाळासाहेब पाटील यांनी मानले आभार

**कराड/प्रतिनिधी –**

महाराष्ट्र राज्याचे माजी सहकार व पणन मंत्री सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब पाटील यांचा वाढदिवस २९ जुलै रोजी झाला, परगावी असल्याने, ते उपस्थित राहू शकले नाहीत. तथापि विविध संस्थांचे पदाधिकारी अधिकारी कार्यकर्ते नागरिकांनी विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून वाढदिवस साजरा केला, त्याबद्दल माजी मंत्री बाळासाहेब पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे आभार मानले आहेत.

प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, - बुधवार दिनांक २९ जुलै २०२६ रोजी माझा वाढदिवस होता. सदर दिवशी परगावी असल्याने मला कराड येथे उपस्थित राहता आले नाही. माझ्या वाढदिवसाच्या दिवशी मी परगावी असतानाही राज्यभरातून माझे सोबत काम केलेले राज्यातील विविध पक्षांचे पदाधिकारी, तसेच बंधु-भगिनींनी, विविध शासकिय विभागाचे अधिकारी व सेवक वर्ग, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद, नगरपालिका, पंचायत समिती, ग्रामपंचायतींचे आजी माजी सदस्य, विविध बँका, साखर कारखाने, पतसंस्था, गृहनिर्माण संस्था, पाणी पुरवठा, सेवा सोसायटी, खरेदी विक्री संघ, बाजार समिती



आदि विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी व सेवक वर्ग, तसेच सातारा जिल्ह्यातील विविध मतदार संघातील बंधू-भगिनी, तरुण कार्यकत्यांनी, सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याचे ऊस उत्पादक सभासद, पदाधिकारी, अधिकारी व सेवक वर्ग, आणि शेतकरी, कष्टकरी, व्यावसायिक, हितचिंतक, पत्रकार बंधू, विद्यार्थी-विद्यार्थीनी आणि युवा कार्यकर्ते यांनी ट्वीटर, फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉटसअप, ईमेल, फ्लेक्स बोर्ड, दूरचित्रवाहिनी आणि वर्तमानपत्र आदी प्रसारमाध्यमे व मोबाईलद्वारे शुभेच्छा दिल्या, त्याबद्दल मी आपणां सर्वांचे मनपूर्वक आभार मानतो.

आपल्या सर्वांच्या शुभकामना मला सदैव विधायक कामासाठी प्रेरणा व ऊर्जा देत राहतील. आपला माझ्या बद्दलचा स्नेह व आपूलकी अशीच वृद्धिंगत व्हावी.

# विटा येथे 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान' समाधान शिबिर संपन्न

## सुमारे १,५०० लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ;लोकप्रतिनिधींकडून प्रशासनाच्या कार्याची प्रशंसा

**विटा/प्रतिनिधी:–**

महाराष्ट्र शासनाच्या 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान' अंतर्गत २८६ खानापूर विधानसभा स्तरीय समाधान शिबिर आज (दि. ३० जुलै २०२६) विटा येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. खानापूर व आटपाडी तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विविध शासकीय योजनांचा लाभ घेतला.

या शिबिरास आमदार सुहास बाबर, जिल्हा परिषद सभापती पृथ्वीराज पाटील, माजी नगराध्यक्ष वैभव पाटील, सभापती सुवर्णा भोसले, उपसभापती सुहास शिंदे, विटा नगराध्यक्षा काजल म्हेत्रे, माजी उपनगराध्यक्ष अविनाश चोथे, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, नगरसेवक, सरपंच तसेच विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिबिरामध्ये खानापूर व आटपाडी तालुक्यातील एकूण १,५०० लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा प्रत्यक्ष लाभ देण्यात आला. महसूल विभागामार्फत 'जिवंत सातबारा' मोहिमेअंतर्गत ४२७ लाभार्थ्यांना



सातबारा उतारे, १५६ लाभार्थ्यांना धान्य मागणी मंजुरी आदेश तसेच १०८ लाभार्थ्यांना संजय गांधी निराधार योजनेचे मंजुरी आदेश, तसेच लक्षीमुक्ती योजना, तुकडेबंदी नियमाकुल आदेश वितरित करण्यात आले.

पंचायत समितीमार्फत २४ महिला बचत गटांना एकूण १ कोटी ८४ लाखांचे कर्जवाटप करण्यात आले. तसेच २२ घरकुल लाभार्थ्यांना घरांच्या चाव्यांचे वितरण करण्यात आले. याशिवाय महिला व बालविकास विभाग मार्फत स्तनदा मातांना बेबी केअर किट, तसेच मातृवंदना योजना लाभ प्रदान करण्यात आले.

नगरपरिषदेमार्फत आवास योजनेच्या लाभार्थ्यांना प्रत्येकी १ लाखांचे अनुदान वितरित करण्यात आले. कृषी विभागामार्फत पात्र शेतकऱ्यांना ट्रॅक्टर व कृषी अवजारांचे वाटप करण्यात आले. वन विभागाने ५ नुकसान भरपाई आदेशांचे वितरण केले. परिवहन विभागाने शिबिरस्थळीच १२५ लाभार्थ्यांना राष्ट्रीय सामान्य गतिशीलता कार्ड (छउचउ) उपलब्ध करून दिले. महावितरण मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनेची माहिती देण्यात आली.

यावेळी आमदार सुहास बाबर यांनी खानापूर विधानसभा मतदारसंघातील प्रशासन प्रभावी व लोकाभिमुख पद्धतीने कार्यरत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. तसेच, अशा प्रकारचे समाधान शिबिर ग्रामपंचायत स्तरापर्यंत आयोजित करून अधिकाधिक नागरिकांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून द्यावा, अशा सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या.

माजी नगराध्यक्ष वैभव पाटील यांनी विविध शासकीय विभागांच्या सेवा व योजनांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध होत असल्याने नागरिकांचा वेळ, श्रम व खर्चाची मोठी बचत होत असून अशा उपक्रमांमुळे शासनाविषयीचा विश्वास अधिक दृढ होत असल्याचे सांगितले.

सदर शिबिराचे नियोजन उपविभागीय अधिकारी डॉ. विक्रम बांदल, तहसीलदार योगेश टोंपे, आटपाडी तहसीलदार शीतल बंडगर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी महसूल, पंचायत समिती , कृषी, वन, परिवहन, नगरपरिषद , महावितरण , बचत गट, टपाल विभाग, भूमी अभिलेख तसेच विविध शासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करून नागरिकांना तात्काळ सेवा व लाभ उपलब्ध करून दिले.

# बासुंदीच्या गुणवत्तेवर ग्राहकांचे प्रश्नचिन्ह

## अन्न व औषध प्रशासनाकडे लेखी तक्रार

**सातारा/प्रतिनिधी:–**

सातारा शहरातील एका दुग्धजन्य पदार्थ विक्री केंद्रातून खरेदी करण्यात आलेल्या बासुंदीच्या गुणवत्तेबाबत ग्राहकाने आक्षेप घेत अन्न व औषध प्रशासनाकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. उत्पादनातून दुर्गंधी येत असल्याचा तसेच आवश्यक उत्पादनविषयक माहिती न दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला असून, या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

महादरे (ता. सातारा) येथील राहुल आनंदराव जाधव यांनी सहाय्यक आयुक्त संजय शिंदे यांच्याकडे दिलेल्या तक्रारीनुसार, गुरुवारी (दि. ३०) त्यांनी शुक्रवार पेठेतील बदामी विहीर परिसरातील हेगडे फूड प्रॉडक्ट्सच्या विक्री केंद्रातून बासुंदी खरेदी केली. संबंधित उत्पादन साध्या प्लास्टिकच्या पिशवीत देण्यात आले असून त्यावर उत्पादनाची तारीख,



बॅच क्रमांक, वापरण्याची अंतिम मुदत तसेच इतर आवश्यक तपशील नमूद नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.

तक्रारीत पुढे नमूद केल्याप्रमाणे, घरी जाऊन बासुंदी उघडल्यानंतर त्यातून तीव्र उग्र वास येत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. याबाबत त्यांनी तत्काळ विक्री केंद्रात जाऊन विचारणा केली; मात्र कर्मचाऱ्यांकडून समाधानकारक प्रतिसाद मिळाला नसल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित उत्पादनाचे नमुने तपासणीसाठी घेण्यात यावेत, उत्पादनाची गुणवत्ता तपासावी आणि नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी राहुल जाधव यांनी अन्न व औषध प्रशासनाकडे केली आहे.

दरम्यान, राज्यभर अन्नभेसळ आणि निकृष्ट दर्जाच्या खाद्यपदार्थांविरोधात तपासणी मोहीम सुरू असताना साताऱ्यात आलेल्या या तक्रारीमुळे दुग्धजन्य पदार्थांच्या गुणवत्तेचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. या तक्रारीवर अन्न व औषध प्रशासन कोणती भूमिका घेते आणि तपासणीनंतर काय निष्कर्ष समोर येतात, याकडे ग्राहकांचे लक्ष लागले आहे.

# दळण आणण्यासाठी निघालेल्या महिलेची सोनसाखळी हिसकावली

**सातारा/प्रतिनिधी:–**

कूपर कॉलनी परिसरात पायी जात असलेल्या महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मिनी गंठण अज्ञात चोरट्याने हिसकावून नेल्याची घटना घडली असून सातारा शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

स्मिता अभय जाधव (वय ४४, रा. गुरुवार पेठ) या २३ जुलै रोजी सायंकाळी दळण ठेवण्यासाठी गिरणीकडे पायी जात होत्या. कूपर कारखान्यासमोरील रस्त्यावर अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मिनी गंठण झडप घालून लंपास केले आणि तेथून पळ काढला. या प्रकरणी अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला असून महिला पोलिस हवालदार कदम पुढील तपास करत आहेत.

# पुसेगाव येथील रखडलेल्या रस्त्याच्या कामाविरोधात ग्रामस्थ आक्रमक

## तीव्र आंदोलनाचा 'प्रताप जाधव' यांचा इशारा!

**पुसेगाव/प्रतिनिधी:–**

सातारा-पंढरपूर महामार्गावरील श्री सेवागिरी महाराजांचे तीर्थक्षेत्र आणि प्रमुख बाजारपेठ असलेल्या पुसेगावमधील रस्त्याचे काम कित्येक वर्षांपासून रखडले आहे. बेजबाबदार प्रशासन आणि निष्क्रिय रस्ते विभागाविरोधात आता लढा उभारण्याची वेळ आली असून, गावच्या विकासासाठी सर्व सुज्ञ ग्रामस्थ व युवकांनी गट-तट बाजूला ठेवून संघर्षासाठी सज्ज व्हावे, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते प्रताप जाधव यांनी केले आहे.

महामार्गाचे काम अपूर्ण असल्याने रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून रस्ता अत्यंत अरुंद झाला आहे. गावात सर्वत्र चिखलाचे साम्राज्य पसरले असून श्री सेवागिरी महाराजांच्या दर्शनासाठी येणाऱ्या हजारो



भाविकांचे व स्थानिक नागरिकांचे हाल होत आहेत. हे सर्व उघड्या डोळ्यांनी पाहत असतानाही सर्वपक्षीय राजकीय नेतेमंडळी मात्र 'मूग गिळून' गप्प आहेत.

ज्या नागरिकांची घरे व दुकानांच्या जागा या रस्त्यात जात आहेत, त्यांना प्रशासनाकडून नुकसानभरपाई देण्याचे कबूल करण्यात आले होते. मात्र, आजतागायत एकाही नुकसानग्रस्त जागामालकाला भरपाई मिळालेली नाही. आश्वासनांची खैरात करून सर्वजण गायब झाले आहेत. प्रशासकीय यंत्रणेसोबत ग्रामस्थांच्या २ ते ३ वेळा बैठका झाल्या. यात्रेनंतर काम पूर्ण करू, असे ठाम आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले होते; मात्र त्यानंतर याकडे कोणीही वळून पाहिले नाही.

येत्या १५ दिवसांच्या आत संबंधित विभागाने रस्त्याच्या कामाबाबत योग्य ती ठोस भूमिका घ्यावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा देण्यात आला आहे. हे आंदोलन रस्ते विभाग व प्रशासनाच्या विरोधात असून, वेळेत तोडगा न निघाल्यास गावातून एकाही प्रशासकीय अधिकाऱ्याची गाडी जाऊ देणार नाही, असा स्पष्ट इशाराही जाधव यांनी दिला आहे.

गेंड्याचे कातडे पांघरलेले प्रशासन व 'मेघा' कंपनीला जाग येणार का?

गावात स्ट्रीट लाईटचे खांब उभे करून जगमगाट करण्याचे आश्वासन देऊन पळून गेलेले 'मेघा' कंपनीचे कंत्राटदार अद्याप गायबच आहेत. त्यांनी आणलेले खांब सध्या धूळ खात पडले आहेत. गेंड्याचे कातडे पांघरलेले प्रशासन आणि मेघा कंपनीला पुसेगावातील रस्ते व लाईटच्या या दुरवस्थेबद्दल आता तरी जाग येईल का? आणि जर आता जाग आली नाही, तर ती जाग आणावीच लागेल, असा संतप्त इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

### सत्ताधाऱ्यांना टोला

स्थानिक निवडणुका कधी लागतात याची वाट बघत बसलेल्या, सरपंचकी व गावची सत्ता मिळवण्यासाठी 'गुडघ्याला बाशिंग' बांधून बसलेल्या राजकीय पुढाऱ्यांनीही राजकीय मतभेद बाजूला ठेवून गावच्या विकासासाठी व या आंदोलनासाठी एकत्र यावे.

### धूळ खात पडलेले 'मेघा' कंपनीचे खांब

स्ट्रीट लाईटचे खांब उभे करून गावात जगमगाट करू असे आश्वासन देणारे मेघा कंपनीचे कॉन्ट्रॅक्टर पळून गेले असून त्यांनी आणलेले खांब गावात धूळ खात पडले आहेत. या फसवणुकीविरोधातही रयत संघटनेच्या वतीने मेघा कंपनीला निवेदन देण्यात आले असून .ग्रामस्थांमध्ये प्रचंड रोष असल्याचे कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक गणेश जाधव यांनी म्हटले आहे.

# दिव्यांग लाभार्थींना मिळणार अनुदान:नगराध्यक्षा सौ.काजल म्हेत्रे

## विटा नगरपरिषदेच्यावतीने कागदपत्रे पूर्ततेसाठी आवाहन :पात्र लाभार्थ्यांना मिळणार ४५०० रुपयांचे अर्थसहाय्य

**विटा/प्रतिनिधी:––**

दिव्यांग बांधवांना आर्थिक आधार देण्यासाठी विटा नगरपरिषदेच्या वतीने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी अनुदान योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत पात्र दिव्यांग लाभार्थ्यांना उदरनिर्वाहासाठी प्रत्येकी ४५०० रुपयांचे अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. पात्र लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन नगराध्यक्षा सौ. काजलताई म्हेत्रे यांनी केले.

खानापूर-आटपाडी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुहासभैय्या बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच नगराध्यक्षा सौ.काजलताई म्हेत्रे, उपनगराध्यक्ष अमोलदादा बाबर, महिला व बालकल्याण सभापती सौ.अपर्णाताई रणजित पाटील, महिला व बालकल्याण उपसभापती सौ. शिलाताई अशोक लिपारे आणि



मुख्याधिकारी विक्रमसिंह पाटील यांच्या नेतृत्वाखाली विटा नगरपरिषदेकडून विविध सामाजिक व कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी केली जात आहे. दिव्यांग बांधवांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने या योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

नगर विकास विभागाच्या २८ ऑक्टोबर २०१५ आणि १० मे २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या एकूण निधीपैकी किमान पाच टक्के निधी दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणासाठी राखीव ठेवणे आवश्यक आहे. या तरतुदीनुसार विटा नगरपरिषदेने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात दिव्यांग बांधवांसाठी निधी उपलब्ध करून दिला आहे.

योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र दिव्यांग व्यक्तींनी विटा नगरपरिषद कार्यालयात अर्ज सादर करावा. अर्जासोबत दिव्यांग प्रमाणपत्र, आधारकार्ड, बँक पासबुकची छायांकित प्रत, रहिवासी पुरावा तसेच आवश्यक कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. प्राप्त अर्जांची छाननी करून शासनाच्या निकषांनुसार पात्र लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे.याबाबत अधिक माहिती साठी विभागप्रमुख नेहा खडके यांच्याशी संपर्क साधावा

पात्र लाभार्थ्यांना मंजूर अनुदानाची रक्कम त्यांच्या बँक खात्यावर थेट डीबीटी (ऊइढ) पद्धतीने जमा करण्यात येणार आहे. त्यामुळे लाभार्थ्यांनी बँक खात्याची माहिती अचूकपणे सादर करावी, असे आवाहन नगरपरिषद प्रशासनाने केले आहे. दिव्यांग बांधवांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आणि त्यांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी ही योजना महत्त्वपूर्ण आहे. नगरपरिषद हद्दीतील एकही पात्र दिव्यांग लाभार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये, यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. पात्र लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह वेळेत अर्ज करून योजनेचा लाभ घ्यावा,असे उपनगराध्यक्ष अमोलदादा बाबर यांनी सांगितले

दिव्यांग बांधव-भगिनींनी या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून विटा नगरपरिषद कार्यालयात अर्ज सादर करावेत, असे आवाहन नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.


**महाराष्ट्र शासन–जलसंपदा विभाग**
**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे**
**अधीक्षक अभियंता, उभारणी मंडळ, कोल्हापूर**
**कार्यकारी अभियंता, टेंभु विद्युत (विवयां) उपसा सिंचन विभाग, ओगलेवाडी–कराड पीन क्र. ४१५१०५**
**ई–मेल eetembhuem@rediffmail.com**

**ई–निविदा सुचना क्र. १३ सन २०२५–२०२६ (तृतीय प्रसिध्दी)**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, टेंभू विद्युत (विवयां) उपसा सिंचन विभाग, ओगलेवाडी कराड, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम परवानाधारक विद्युत निविदाकारांकडुन खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सुचना ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार अधीक्षक अभियंता, उभारणी मंडळ, कोल्हापूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा किंमत |
|---|---|---|
| १ | टेंभू उपसा सिंचन योजना टप्पा क्र. ३ पासुन टप्पा क्र. ४ पर्यंत ३३ केव्ही पारेषण वाहिनीचा पुरवठा, उभारणी, चाचणी व कार्यान्वितीकरण करणे. | रु. १,९९,७२,४२३/- |

जिल्हा - सातारा
ई-निविदा उपलब्ध कालावधी - दिनांक ३१.०७.२०२६ ते दि. ०७.०८.२०२६
ई-निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक - दिनांक ०७.०८.२०२६
ई-निविदा उघडण्याचा दिनांक - दिनांक १०.०८.२०२६

जा.क्र. टेवि (विवयां) उसिवि/लेशा-२/निविदा सुचना/
कार्यकारी अभियंता, टेंभू विद्युत (विवयां) उपसा सिंचन विभाग, ओगलेवाडी-कराड
दिनांक-

**सही/-**
**(प्र.पुं. बिराडे)**
**कार्यकारी अभियंता,**
**टेंभू विद्युत (विवयां) उपसा सिंचन विभाग,**
**ओगलेवाडी-कराड**


# शिराळ्याचे सुपुत्र डॉ. यशवंतराव कुलकर्णी यांची राज्यस्तरीय तज्ज्ञ समित्यांवर निवड

**शिराळा/प्रतिनिधी : –**

नाटोली (ता. शिराळा) येथील सुपुत्र तथा श्री पांडुरंग सहकारी साखर कारखाना, श्रीपूरचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंतराव कुलकर्णी यांची महाराष्ट्र शासनाच्या साखर क्षेत्राशी संबंधित दोन महत्त्वाच्या राज्यस्तरीय तज्ज्ञ समित्यांवर सदस्य म्हणून निवड झाल्याने शिराळा तालुक्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य यांनी राज्यातील सहकारी व खासगी साखर कारखान्यांची सांख्यिकीय माहिती अधिक अचूक, अद्ययावत व संगणकीकृत स्वरूपात उपलब्ध करून देण्यासाठी सांख्यिकीय डेटाबेस तयार करण्यासाठी स्थापन केलेल्या राज्यस्तरीय तज्ज्ञ समितीवर डॉ. कुलकर्णी यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे.

तसेच महाराष्ट्र शासनाच्या सहकार विभागाने राज्यातील साखर



कारखान्यांच्या गाळप क्षमतेनुसार आर्थिक सक्षमतेचा अभ्यास करण्यासाठी साखर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या विशेष अभ्यास समितीवरही डॉ. कुलकर्णी यांची सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे. या समितीमार्फत विविध गाळप क्षमतेच्या साखर कारखान्यांची आर्थिक व्यवहार्यता, ऊस उपलब्धता, सिंचन व्यवस्था, कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर, तसेच गाळप हंगामातील कार्यक्षम कालावधी यांचा सखोल अभ्यास करून शासनाला धोरणात्मक अहवाल सादर करण्यात येणार आहे.

डॉ. यांनी, साखर उद्योगात दीर्घकाळ विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या असून, महाराष्ट्र शासन आणि केंद्र शासनाच्या अनेक समितीवर तज्ञ सल्लागार म्हणून कार्यरत आहेत. तांत्रिक, प्रशासकीय आणि व्यवस्थापन क्षेत्रातील त्यांच्या अनुभवाची राज्यस्तरावर सातत्याने दखल घेतली जात आहे. त्यांच्या अनुभवाचा लाभ राज्याच्या साखर उद्योगासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या विविध धोरणात्मक निर्णयांमध्ये होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

राज्यस्तरीय दोन महत्त्वाच्या तज्ज्ञ समित्यांवरील निवडीमुळे शिराळा तालुक्याचा गौरव वाढला असून, सहकार, साखर उद्योग, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी डॉ.कुलकर्णी यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# सेव्हन स्टार मॉल परिसरातील पानटपरीवर छापा; प्रतिबंधित पानमसाला जप्त

**सातारा/प्रतिनिधी:–**

अन्न व औषध प्रशासनाने शहरातील सेव्हन स्टार मॉल परिसरात प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीविरोधात कारवाई करत एका पानटपरीवर छापा टाकला. या कारवाईत विविध कंपन्यांचा प्रतिबंधित पानमसाला व तंबाखू असा २,८४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून संबंधित विक्रेत्याविरुद्ध शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पंजाब नॅशनल बँकेसमोरील भारत गोपीचंद पवार (वय २६, रा. म्हसवे, ता. जि. सातारा) यांच्या पानटपरीवर २९ जुलै रोजी दुपारी अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने छापा टाकला. तपासणीदरम्यान सुमारे दीड किलो वजनाचा विमल पानमसाला, किंग तंबाखू आणि रॉयल रजनीगंधा आढळून आला. हा साठा जप्त करून अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ मधील संबंधित कलमांनुसार कारवाई करण्यात आली.

या प्रकरणी अन्न सुरक्षा अधिकारी प्रियांका वाईकर यांनी फिर्याद दिली असून पोलीस उपनिरीक्षक के. के. बागवान तपास करत आहेत.

# ईश्वरपूर नगरपालिकेचे नगराध्यक्ष मलगुंडे यांच्या अपात्रतेला स्थगिती

**पान १ वरुन**

विभागाच्या आदेशात नमूद करण्यात आले आहे. तसेच सक्षम प्राधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार अपील अर्जावर पुढील आदेश होईपर्यंत जिल्हाधिकाऱ्यांच्या दि.१० जुलै २०२६ रोजीच्या आदेशास स्थगिती देण्यात आली आहे. त्यामुळे ईश्वरपूरच्या नगराध्यक्षपदी पुन्हा एकदा आनंदराव मलगुंडे व नगरसेवकपदी सुनील मलगुंडे यांची वर्णी लागली आहे.